नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd
अंक - २८२ | Issue - 282
वार मंगळवार दि. ३ मार्च २०२६ | Blow- Tuesday Date 3 March 2026
ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com
वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com
पाने - ४ | Pages - 4
किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs
पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026
ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# खामेनींच्या मृत्यूनंतर भारतात हाय अलर्ट जम्मू काश्मीरमध्ये बंदोबस्तात वाढ

## इराणी, अमेरिकन आणि इस्त्रायली दूतावास आणि वाणिज्य दूतावासांभोवती सुरक्षा मजबूत करण्याचे निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाला आणि भारतात हाय अलर्ट जाहीर झाला आहे. जम्मू काश्मीरमध्ये बंदोबस्तात वाढ करण्यात आली आहे. अयातुल्ला अली खामेनी हे शिया मुसलमानांचे धर्मगुरु होते. जगातील अनेक देशांतले आणि प्रामुख्याने भारतातले शिया मुसलमान त्यांचा धर्मगुरु म्हणून आदर करत होते. या पार्श्वभूमीवर अमेरिका - इस्त्रायलच्या हवाई हल्लूयात खामेनींचा मृत्यू झाल्यानंतर भारतासह अनेक देशांमध्ये ठिकठिकाणी शिया मुसलमानांच्यावतीने अमेरिका आणि इस्त्रायल यांचा निषेध करण्यासाठी आंदोलनं करण्यास सुरुवात झाली आहे. या पार्श्वभूमीवर देशांतर्गत हाय अलर्ट देण्यात आला आहे तसेच काही ठिकाणी बंदोबस्तात वाढ करण्यात आली आहे.



आंतरराष्ट्रीय घडामोडींचा भारताच्या अंतर्गत सुरक्षेवर परिणाम होऊ शकतो यामुळे देशांतर्गत कार्यरत असलेल्या सर्व सुरक्षा यंत्रणांना केंद्रीय गृहमंत्रालयाने हाय अलर्ट दिला आहे. इराण समर्थक आणि इराण विरोधी गटांच्या कारवायांवर बारकाईने लक्ष ठेवण्याचे आणि इराणी, अमेरिकन आणि इस्त्रायली दूतावास आणि वाणिज्य दूतावासांभोवती सुरक्षा मजबूत करण्याचे निर्देश केंद्रीय गृहमंत्रालयाने दिले आहेत.

केंद्रीय गृह मंत्रालयाने शिया मिलिशिया तसेच इस्लामिक स्टेट आणि अल-कायदा सारख्या दहशतवादी संघटनांकडून निर्माण होणाऱ्या संभाव्य धोक्यांकडेही लक्ष वेधले आहे. गुप्तचर यंत्रणेने दिलेल्या माहितीवरून असे दिसून येते की दहशतवादी गट अशांतता निर्माण करण्यासाठी या तणाव-पूर्ण वातावरणाचा फायदा घेण्याचा प्रयत्न करू शकतात. त्यामुळे विशेष खबरदारी घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

दूतावास, प्रमुख पर्यटन स्थळे, ज्यू संस्था आणि पाश्चात्य-संलग्न आस्थापनांना संभाव्य लक्ष्य म्हणून सूचीबद्ध केले आहे. केंद्र सरकारने राज्यांना मोक्याच्या आणि संवेदनशील ठिकाणी बंदोबस्त वाढवण्याच्या सूचना दिल्या आहेत. गर्दीच्या तसेच संवेदनशील ठिकाणी बंदोबस्त वाढवण्यास सांगितले आहे. तसेच संशयास्पद ठिकाणी तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# इराणचा सौदीच्या तेल शुद्धीकरण प्रकल्पावर हल्ला, जगाची वाढली चिंता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



तेहरान : अमेरिका आणि इस्त्रायल विरुद्ध इराण अशी लढाई सुरू झाल्यामुळे आखाती देशांमध्ये अस्थिरतेचे आणि अनिश्चिततेचे वातावरण आहे. लढाईत तीन देश थेट सहभागी आहेत आणि दहा पेक्षा जास्त देशांचा लढाईत अप्रत्यक्ष सहभाग आहे. मध्य आशियाचे रुपांतर युद्धभूमीत झाले आहे. इराणने आखाती देशांतील अमेरिकेच्या विविध नौदल तळांवर तसेच हवाई दलाच्या तळांवर हवाई हल्ले केले आहेत. या हल्लूयांना अद्याप संबंधित आखाती देशांनी थेट प्रत्युत्तर दिलेले नाही. या पार्श्वभूमीवर इराणने सौदी अरेबियाची राष्ट्रीय कंपनी असलेल्या 'अराम्को'वर ड्रोनद्वारे हवाई हल्ला केला. जगातील सर्वात मोठी खनिज तेल कंपनी म्हणून मिरवणाऱ्या 'अराम्को'वर ड्रोनद्वारे हल्ला होणे ही बाब सौदीसाठी प्रतिष्ठेचा विषय झाली आहे. हल्ला झाल्यामुळे 'अराम्को'ने सोमवारी रास तनुरा येथील तेल शुद्धीकरण बंद केलं. रास तुनरा येथील तेल शुद्धीकरण बंद झाल्यावर बेंट क्रूड तेलाच्या किमती ९.३२ टक्क्यांनी वाढल्या.

खबरदारीचा उपाय म्हणून रास तनुरामधील तेल शुद्धीकरण प्रक्रिया बंद ठेवण्यात आली आहे. पण परिस्थिती नियंत्रणात आहे. मात्र सौदीच्या कंपनीवर हल्ला झाल्यामुळे अनेक देश चिं-तेत आहेत. आखाती देशांतून जगाला मोठ्या प्रमाणात तेलाचा पुरवठा होतो. या परिस्थितीत आखाती देश लढू लागल्यापासून तेलाच्या दरात वाढ होऊ लागली आहे. तेलाच्या दरांनी गेल्या चार वर्षांमधील उच्चांक गाठला आहे. होर्मुज सामुद्रध-ुनीतून होणारा व्यापार जवळपास ठप्प आहे. जगा-तील अनेक देश अराम्को कंपनीकडून तेल खरेदी करतात. यात चीन, जपान, दक्षिण कोरिया, भारत, अमेरिका या प्रमुख देशांचा समावेश आहे. भारत दिवसाला १.१ मिलियन बॅरल्स खनिज तेल सौदी अराम्कोकडून खरेदी करतो. जपान त्यांच्या गरजेच्या ४० टक्के तेल खरेदी अराम्कोकडून करतो. यासोबतच फिलीपीन्स, मलेशिया, थायलंड, सिंगापूर, तैवान, पोलंड, नेदरलँड्स, इटली, स्पेन, फ्रान्स, ग्रीन, इजिप्त, जॉर्डन, बहारिन, दक्षिण आफ्रिकादेखील अराम्कोकडून खनिज तेल खरेदी करतात. लढाईत तेल विहिरी आणि तेल शुद्धीकरण प्रकल्प यांना वारंवार लक्ष्य केले तर तेलाच्या किंमती उसळण्याचा धोका आहे. यामुळे युद्ध आणखी धोकादायक स्थितीत पोहोचण्याची शक्यता वाढली आहे.

# कांद्याच्या दरात मोठी घसरण, उत्पादन खर्चही निघेना, शेतकरी संघटना आक्रमक, १५०० रुपये अनुदान देण्याची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : सध्या राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी संकटता आहेत. कारण कांद्याच्या दरात मोठी घसरण झाली आहे. याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. उत्पादन खर्चही निघने कठीण झालं आहे. त्यामुळं शेतकरी चिंतेत आहेत. असातच स्वाभिमानी शेतकरी संघटनेनं आक्रमक पवित्रा घेतला आहे. कांद्याच्या घसरत्या दराविरोधात नाशिक जिल्ह्यातील विंचूर येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेने रास्ता रोको आंदोलन केलं. कांद्याला १ हजार ५०० रुपये अनुदान देण्याची मागणी केली आहे.

कांद्याच्या दरात सातत्याने घसरत असल्यामुळं शेतकरी संघटना आक्रमक

कांद्याच्या दरात सातत्याने घसरण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने आज विंचूर येथे उपबाजार समितीसमोर नाशिक-छत्रपती संभाजीनगर राज्य मार्गावर रास्ता - रोको आंदोलन करण्यात आले. आंदोलना दरम्यान, संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आणि शेतकऱ्यांनी जोरदार घोषणाबाजी करत शासनाविरोधात संताप व्यक्त केला. सध्या कांद्याला उत्प-ादन खर्चापेक्षाही कमी दर मिळत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. यामुळं कांद्याला तात्काळ पंधराशे रुपये प्रति क्विंटल अनुदान द्यावे, तसेच कांद्याला समांतर बाजार भाव योजना लागू करावी आदी म ागण्या करण्यात आल्या.



साधारणत: गेल्या दोन महिन्यांत कांद्याचे दर क्विन्टलला ८०० रुपयांनी घसरले आणि नाशिक जिल्ह्यात आंदोलनाचे सत्र सुरू झाले. लाल कांद्याची आवक वाढलेली असताना देशांतर्गत घटलेली मागणी आणि थंडावलेली निर्यात घाऊक बाजारातील दरावर प्रभाव पाडत आहे. उशिराच्या खरीपापाठोपाठ (लेट खरीप) लवकरच उन्हाळी कांदा बाजारात येण्यास सुरुवात होईल. वेळीच उपाययोजना न झाल्यास दरात चढ-उताराची भीती शेतकरी वर्गासह बाजार समित्यांकडून व्यक्त केली जात आहे.

कांद्याचा लागवडीचा हंगाम हा १५ नोव्हेंबर ते १५ जानेवारी असतो. मात्र, यंदा ऑक्टोबरच्या शेवटच्या आणि नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात पाऊस झाल्यामुळे कांदा रोपांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे लागवडीसाठी रोपांचा तुटवडा जाणवत आहे. कांदा बियाणांचे दर प्रतिकिलो २५०० ते ३००० रुपये आहेत. एकरी तीन किलो बियाणे लागते. त्याम ुळे शेतकऱ्यांना कांदा लागवडीचा खर्चसुद्धा निघत नसल्याने आता कांदा लागवड करणे शेतकऱ्यांना परवडत नाही. अतिवृष्टी, अवकाळी पावसामुळे कांदा मोठ्या प्रमाणात खराब झाला आहे. सोलापूर जिल्ह्यासह अनेक ठिकाणी खरीप आणि लेट खरीप पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांनी लाखो रुपये खर्च करून पिकविलेला कांदा मातीमोल झाला आहे.

सध्या कांद्याचे दर कमी असून, काढणीनंतर जेव्हा कांदा विक्रीसाठी बाजारात येतो, तेव्हा अनेक वेळा बाजारभावात खूप घसरण होते. यामुळे शेतकऱ्यांना लागवडीचा खर्चही मिळणे कठीण झाले आहे. यापूर्वी काही ठिकाणी दोन महिन्यांपूर्वी ४० रुपये किलो असलेला कांद्याचा दर सध्या ८ ते १० रुपये प्रतिकिलोवर आला आहे.

# जय पवारांनी शेअर केलेला व्हिडिओ मी पाहिला; हवाई उड्डाणमंत्री मुरलीधर मोहोळांकडून दखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पुणे: राज्याचे दिवंगत उमुख्यमंत्री अजित पवारांच्या विमानाला २८ जानेव-ारीला झालेल्या अपघातात अजित पवारांसह ५ जणांचा मृत्यू झाला. या घटनेनं देशरात शोककळा पसरली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही अपघ-ाताची गंभीर दखल घेत तपासाची मागणी हवाई मंत्रालयाकडे केली आहे. मात्र, अपघाताच्या १ महिन्यानंतरही संशयाचे धुके कायम आहेत. त्यातच, विमान अपघात चौकशी प्राधिकरणाकडून २२ पानांचा प्राथमिक अहवाल सादर करण्यात आला. तर, दुसरीकडे आमदार रोहित पवार यांच्याकडून व्हीएसआर कंपनीविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी केली जात आहे. आता, अजित पवारांचे सुपुत्र जय पवार यांनी एक व्हिडिओ शेअर करत कंपनी मालकावर प्रश्न उपस्थित केले आहेत. जय पवार यांच्या या व्हिडिओची दखल हवाई राज्यमंत्री म ुरलीधर मोहोळ यांनी घेतली आहे.

अजित पवार यांच्या विमान दुर्घटनासंदर्भात आलेल्या अहवालात सुरुव-ातीला हे विमान झाडावर आदळलं, त्यानंतर जमिनीवर कोसळलं. ही घटना घडली तेव्हा बारामती विमानतळावर ३ हजार मीटर दृश्यम ानता होती, असं अहवालात नमूद करण्यात आलं आहे. तर, उड्डाणापूर्वी पायलटनं मद्यपान केलं नव्हतं, असंही अहवालात म्हटलंय. दरम्यान, अजित पवार यांचे पुत्र जय पवार यांनी एक धक्कादायक व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. यामध्ये तडठ चे मालक रोहित सिंह मुख्य पायलटच्या सीटवर उड्डाणादरम्यान झोपलेले असल्याचा दावा जय पवार यांनी केला आहे. आता, या व्हिडिओवर नागरी उड्डाणमंत्री मुरलीधर मो-होळ यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

जय पवार यांनी शेअर केलेला व्हिडिओ मी पाहिला आहे. मी तो व्हिडिओ पाहिला आहे, योग्य ती दखल घेतली जाणार, असे मंत्री मोहोळ यांनी म्हटले. दरम्यान, आखाती देशातील युद्धजन्य परिस्थितीत बोलताना, देश पातळीवर अनेक पर्यटक अडकलेले आ-हेत, हवाई उड्डाण मंत्रालयाकडून त्याची योग्य ती दखल घेतली जाणार आहे. विमानसेवा सुरू झाल्यानंतर सर्व पर्यटकांना आणले जाईल, आमच्या खात्याची ती जबाबदारी आहे, असे मुरलीधर मोहोळ यांनी म्हटले.

एअरपोर्ट कनेक्टिव्हिटीसाठी प्रयत्न करणार

केंद्रीय प्रकल्पामध्ये केंद्रीय पातळीवरील प्रकल्पांचा आजच्या बैठकीत आढावा घेतला जाणार आहे. त्यामध्ये जायका, मेट्रो, नदी सुधार प्रकल्पाचा बैठकीत आढावा घेतला जाणार आहे. नवीन मार्गाची कनेक्टिव्हिटी, नवीन मेट्रो मार्गाची विमानतळाशी कनेक्टिव्हिटीसाठी प्रयत्न केले जाणार आ-हेत, अशी माहितीही मोहोळ यांनी दिली.

## ईपीएफओनं व्याजदराबाबत घेतला मोठा निर्णय

## पीएफ खात्यात व्याज कधी जमा होणार?

# ईपीएफओकडून व्याज दराची शिफारस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना म्हणजेच ईपीएफओनं २०२५-२६ साठी वायज दर ८.२५ टक्के ठेवण्याची शिफारस केली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार केंद्रीय ट्रस्ट बोर्डाच्या २३९ व्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीचं अध्यक्षपद केंद्रीय श्रममंत्री मनसुख मांडवीय, राज्यमंत्री शोभा करंदलाजे आणि श्रम आणि रोजगार विभागाच्या सचिववंदना गुरनानी यांच्यासह ईपीएफओच्या रमेश कृष्णमूर्ती यांचा समावेश होता.

ईपीएफओच्या ट्रस्ट मंडळाकडून निर्णय घेतल्यांनतर प्रस्तावित व्याज दराबाबतचा प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी वित्त मंत्रालयाला पाठवण्यात येईल. केंद्रीय वित्त मंत्रालयाची मंजुरी मिळाल्यानंतर ती ७ कोटी ईपीएफओ खातेधारकांच्या खात्यात जमा केलं जाईल.




ईपीएफओकडून जमा असलेल्या रकमेवर दरमहा व्याजाची रक्कम मोज-ली जाते. मात्र, प्रत्यक्ष व्याज आर्थिक वर्षाच्या शेवटी दिलं जातं. जर एखादं खातं ३६ महिने निष्क्रिय असल्यास त्यानंतर व्याज दिलं जात नाही.

ईपीएफओनं गेल्या दोन वर्षात ८.२५ टक्के व्याज दर कायम ठेवला आहे. २०२३-२४ मध्ये व्याज दर ८.१५ टक्क्यांवरुन वाढवून ८.२५ टक्के करण्यात आला होता. तर, २०२१-२२ ला ईपीएफओनं ८.१० टक्क्यांनी व्याज जमा केलं होतं. तर, १९७७-७८ मध्ये सर्वात कमी व्याज दर ८ टक्के होता.

विशेष म्हणजे ईपीएफओनं व्याज दरात सलग तिसऱ्या वर्षी कोणताही बदल केलेला नाही. जागतिक अनिश्चिततेचं वाता-वरण, मजबूत आर्थिक शिस्त, शाश्वत आणि स्पर्धात्मक परतावा या सूत्रांनुसार ईपीएफओ काम करत असून. यामुळं ईपीएफओनं चांगल्या प्रकारे व्याज दर दिल्याचं सांगण्यात आलं.

एखादं खातं तीन वर्ष बंद असल्यास म्हणजेच त्या खात्यात रक्कम जमा होत नसल्यास ३६ महिन्यानंतर ते खातं बंद केलं जातं. सेंट्रल बोर्ड ऑफ ट्रस्टीजकडून एका पायलट प्रोजेक्टच्या अंमलबजावणीला मंजुरी दिली आहे. त्यानुसार ज्यांच्या खात्यात १००० रुपये आणि त्यापेक्षा कमी रक्कम असेल त्यांच्या क्लेम ऑटोमेटिक मंजूर केले जा-तील, आणि ती रक्कम खातेदारांना दिला जाईल. पहिल्या टप्प्यात १.३३ लाख खाती निश्चित करण्यात आली आहेत, त्यानुसार ईपीएफओ ५.६८ कोटी रुपये खातेदारांच्या खात्यात पाठवणार आहे. आधार लिंक, ईपीएफओ लिंक बबँक खात्यात कोणताही क्लेम न करता पैसे पाठवले जाणार आहेत.

दरम्यान, ईपीएफओकडून केंद्र सरकारची म्हणजेच केंद्रीय वित्त मंत्रालयाकडून व्याज दराला मंजुरी मि ळाल्यानंतर व्याजाची रक्कम खातेदारांच्या खात्यात जमा केली जाईल. ईपीएफओनं गेल्या वर्षभरात पीएफ क्लेम सेटलमेंट नियमामध्ये मोठे बदल केले आहेत. ऑटो क्लेम सेटलमेंटमुळं खातेदारांचे क्लेम लवकर मंजूर होत आहेत.

# शेअर बाजार क्रॅश, गुंतवणूकदारांचे एका दिवसात ६.५ लाख कोटी स्वाहा, सेन्सेक्स १०४८ अंकांनी कोसळला

मुंबई : भारतीय शेअर बाजारात २ मार्चला घसरण पाहायला मिळाली. अमेरिका आणि इराण यांच्यातील वाढत्या तणावामुळं क्रूड ऑईलचे दर वाढले आहेत. यामुळं शेअर बाजारावर परिणाम झाला. सेन्सेक्स प्री ओपनिंग मार्केटमध्ये २७०० अंकांनी कोसळला होता. दुपारपर्यंत बाजारात सु-धारणा झाली. यामुळं सेन्सेक्स १०४८ अंकांची घसरण झाली आणि सेन्सेक्स ८०२३८.८५ अंकांवर बंद झाला. तर, निफ्टी ३१३ अंकांच्या घसरणीसह २४८६५.७० अंकांवर बंद झाला. सेन्सेक्सवरील घसरणीम ुळं गुंतवणूकदारांचं साडे सहा लाख कोटींची नुकसान झालं आहे.

शेअर बाजारात तेजी आणि घसरण पाहायला मिळाली. निफ्टी आजच्या निचांकावरुन २५० अंकांनी वाढला. वोलॅटिलीटी निर्देशांकात २५ टक्क्यांची वाढ पाहायला मिळाली. मिडकॅप निर्देशांकात जवळपास २१०० अंकांची तेजी आणि घसरण पाहायला मिळाली. अखेर निफ्टी मिडकॅप निर्देशांक ९३५ अंकांच्या घसरणीसह ५८१८१ वर बंद झाला. निफ्टी बँक निर्देशांकात ६८९ अंकांची घसरण होऊन ५९८४० वर बंद झाला.

संरक्षण, मेटल आणि हेल्थकेअर वगळता इतर निर्देशांक घसरणीसह बंद झाले.बीएसईवर लिस्ट असलेल्या कंपन्यांचं बाजारमूल्य ६.५५ लाख कोटींनी घसरलं. बीएसईवर लिस्ट असलेल्या कंपन्यांचं बाजारमूल्य शुक्रवारी ४६३.५० लाख कोटी होतं. आज बाजार बंद झाला तेव्हा बीएसईचं बाजारमूल्य ४५६.९५ लाख कोटी रुपयांवर आलं आहे. म्हणजेच गुंतवणूकदारांना एका दिवसात ६.५५ लाक कोटी रुपयांचं नुकसान सहन करावं लागलं आहे. शेअर बाजारामध्ये आज मोठी घसरण दिसून आली. सेन्सेक्सवरील टॉप ३० पैकी २७ शेअर घसरणीसह बंद झाले. तर, केवळ ३ शेअर तेजीसह बंद झाले.भारती एअरटेल, महिंद्रा अँड महिंद्रा, बजाज फिनसर्व्हे, इंडिगोच्या शेअरमध्ये घसरण पाहायला मिळाली.

## बुधवारी अंक नाही

आज मंगळवार, ३ मार्च २०२६ रोजी धुलिवंदन निमित्त दैनिक यश सिद्धी न्यूज कार्यालयास सुटी आहे. त्यामुळे उद्या बुधवार, ४ मार्च २०२६ रोजीचा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची जाहिरातदार, वाचक, विक्रेत्यांनी नोंद घ्यावी.

– संपादक

## संपादकीय....

### बळीराजाचे नुकसान

सध्या राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी संकटता आहेत. कारण कांद्याच्या दरात मोठी घसरण झाली आहे. याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. उत्पादन खर्चही निघने कठीण झालं आहे. त्यामुळं शेतकरी चिंतेत आहेत. असातच स्वाभिमानी शेतकरी संघटनेनं आक्रमक पवित्रा घेतला आहे. कांद्याच्या दरात सातत्याने घसरण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने आज विंचूर येथे उपबाजार समितीसमोर नाशिक-छत्रपती संभाजीनगर राज्य मार्गावर रास्ता -रोको आंदोलन करण्यात आले. आंदोलना दरम्यान, संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आणि शेतकऱ्यांनी जोरदार घोषणाबाजी करत शासनाविरोधात संताप व्यक्त केला. सध्या कांद्याला उत्पादन खर्चापेक्षाही कमी दर मिळत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. यामुळं कांद्याला तात्काळ पंधराशे रुपये प्रति क्विंटल अनुदान द्यावे, तसेच कांद्याला समांतर बाजार भाव योजना लागू करावी आदी मागण्या करण्यात आल्या. साधारणतः गेल्या दोन महिन्यांत कांद्याचे दर क्विन्टलला ८०० रुपयांनी घसरले आणि नाशिक जिल्ह्यात आंदोलनाचे सत्र सुरू झाले. लाल कांद्याची आवक वाढलेली असताना देशांतर्गत घटलेली मागणी आणि थंडावलेली निर्यात घाऊक बाजारातील दरावर प्रभाव पाडत आहे. उशिराच्या खरीपापाठोपाठ (लेट खरीप) लवकरच उन्हाळी कांदा बाजारात येण्यास सुरुवात होईल. वेळीच उपाययोजना न झाल्यास दरात चढ-उताराची भीती शेतकरी वर्गासह बाजार समित्यांकडून व्यक्त केली जात आहे. कांद्याचा लागवडीचा हंगाम हा १५ नोव्हेंबर ते १५ जानेवारी असतो. मात्र, यंदा ऑक्टोबरच्या शेवटच्या आणि नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात पाऊस झाल्यामुळे कांदा रोपांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे लागवडीसाठी रोपांचा तुटवडा जाणवत आहे. कांदा बियाणांचे दर प्रतिकिलो २५०० ते ३००० रुपये आहेत. एकरी तीन किलो बियाणे लागते. त्यामुळे शेतकऱ्यांना कांदा लागवडीचा खर्चसुद्धा निघत नसल्याने आता कांदा लागवड करणे शेतकऱ्यांना परवडत नाही. अतिवृष्टी, अवकाळी पावसामुळे कांदा मोठ्या प्रमाणात खराब झाला आहे.

## निर्भीड, निरपेक्ष, बेधडक आणि पारदर्शी पत्रकारितेचे दीपस्तंभ म्हणजे वरिष्ठ पत्रकार : महेश (काका)गायकवाड...!!!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हातीयार और औजार अपने पास रखे जनाब हम तो वो जमात है जो खंजर नहीं कलम से चोट करते है

हे वाक्य पुरेपूर लागू होतं ते म्हणजे लोकशाहीचा चौथा स्तंभ पत्रकारिता अतिशय निर्भीडपणे चालवणारे तसेच सामाजिक कार्यास नेहमीच प्रोत्साहित करणारे चळवळीतील आमचे मार्गदर्शक काका आदरणीय महेश गायकवाड यांना.

आई चंपाबाई व वडील शंकरराव गायकवाड या दाम्पत्याच्या पोटी अचलेर येथे त्यांचा जन्म झाला.

घरामध्ये शैक्षणिक वातावरणासोबत धार्मिक वातावरण हे तितकेच होते.

त्यांचे वडील महादेवाचे निस्सिम भक्त गणले जायचे.

ते सात भावंडे व दोन बहीणी असा मोठा परिवार या सर्वांनाच वडिलांकडून सुसंकृत वारसा मिळाला आणि तो जपण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

त्यापैकीच एक असलेले काकाश्री अगदी सुरुवातीपासूनच वाचनाची व लिखाणाची आवड असल्यामुळे त्यांनी अल्पावधीतच आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून राज्यात च नाही तर परराज्यात एक चांगले नावलौकिक मिळविले आहेत.

तत्वाने,इमानदारीने,व सडेतोडपणाने आणि कुणाचीही भीडभाड न ठेवता आणि सडेतोड पत्रकारिता करत, त्यांनी आपल्या पारदर्शी पत्रकारितेचे उत्तम उदाहरण समाजात ठेवून रोखठोक व निर्भीड पत्रकारिता करत कित्येकांना नाराज करणारी पण निःपक्ष आणि निर्भीड व रोखठोक आणि पारदर्शी पत्रकारिता करण्याचा प्रामाणिक प्रयत्न त्यांनी आज पर्यंत केला आहेत.



कित्येक जवळच्यांना आपल्या रोखठोक भूमिकेमुळे आणि बातमीमुळे त्यांना आपले मित्र नातेवाईक स्नेही यांना गमवावे लागले आहे, रोखठोक भूमिकेमुळे अनेक जण त्यांच्या पासून दुरावले आहेत. परंतु त्यांनी आपले कर्तव्य प्रामाणिक पत्रकारितेशी टिकवून ठेवले आहेत. मी पत्रकार महेश गायकवाड यांना आपल्या रोखठोक भूमिकेबद्दल विचारले असता त्यांनी सांगितले की, माझ्या विरोधात भरपूर शत्रु निर्माण झाले आहेत, कारण मी मागे कधीच हटत नाही, मी कर्माला महत्व देतो . हेच माझ्या शत्रूंना अस्वस्थ करणारे आहे जितके शत्रू रोखठोक भूमिकेमुळे निर्माण झाले आहेत त्याच्या किती तरी पटीत जनता माझ्या पत्रकारितेसोबत खंबीर पणाने उभी आहे असे ही त्यांनी मला सांगितले.

सर्वसामान्य जनता, वंचित घटक, महत्त्वाच्या समस्या यावर लिहिण्याचा व न्याय देण्याचा कायम प्रयत्न त्यांनी केला आहे. व यापुढेही ते करीत राहतील.

आपल्या सुयश मिडिया च्या माध्यमातून अगदी जलद अन् वेगवान बातमी वाचकांच्या समोर येते ती केवळ महेश गायकवाड यांच्यामुळे.

ही गुलामगिरी,नोकरशाही आणि एकाधिकार शाही त्यांनी स्वतः संपविली आहे.

एकाच वृत्तपत्राची पत्रकारिता करणे ही गुलामगिरी सोलापूर जिल्ह्यामध्ये सर्व प्रथम त्यांनी स्वतः संपविली

अनेक वृत्तपत्रांचे प्रतिनिधी म्हणून काम करीत असताना एकाच वृत्तपत्राचे काम करावे ही

मिरासदारी सर्व प्रथम त्यांनी संपविली आणि पत्रकारिता क्षेत्रातील गुलामगिरीला लाथ मारत मालकशाहीला लगाम आणि वेसण घातली आहे.

हे जे धाडस त्यांनी केले ते केवळ वाचकांच्या जोरावर केले आहे.

साप्ताहिक चैत्यभूमी हे वृत्तपत्र ते स्वतः चालवतात अन् तो भरघोस विकला जातो. वाचकांचा त्याला भरभरून प्रतिसाद मिळत आहे.

गेल्या ३८ वर्षाच्या पत्रकारिता काळात वरिष्ठ पत्रकार महेश गायकवाड यांनी सर्वाधिक पत्रकारितेचा काळ हा गोर गरिबांच्या प्रश्नावर आवाज उठवत पूर्ण केले आहेत. आंबेडकरी आणि बहुजन समाजातील प्रश्नांवर त्यांनी अनेक वेळा फोकस निर्माण करून या चळवळीतील उणिवांवर प्रकाश टाकण्याचे धाडस नेहमीच त्यांनी केले आहे. प्रदीर्घ पत्रकारितेच्या काळात त्यांनी आपल्या स्वमालकीच्या वृत्तपत्राची स्थापना करून सोलापूर येथून प्रकाशित होणारे साप्ताहिक चैत्यभूमी हे वृत्तपत्र एक दर्जेदार आणि निर्भीड वृत्तपत्र म्हणून नावारूपास आणले आहे. अलीकडच्या सोशल मीडियाच्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी महेश गायकवाड यांनी सुयश मीडिया ग्रुप ची निर्मिती केली आणि सुयश मीडिया ग्रुपचे जाळे त्यांनी महाराष्ट्रभर पसरवले आहे पॉझिटिव्ह पत्रकारिता न करता आणि निगेटिव्ह पत्रकारितेला प्राधान्य न देता सर्वसमावेश पत्रकारिता करून महेश गायकवाड यांनी आपल्या रोखठोक आणि निर्भीड व पारदर्शी पत्रकारितेची भूमिका राज्यात निर्माण केली आहे. बहुजनांची अस्मिता, वस्तुनिष्ठ बातम्या आणि पारदर्शी पत्रकारिता हीच आमची भूमिका या विचारातून त्यांनी आजपर्यंत आपली पत्रकारिता सुरू ठेवली आहेत.

आज आम्ही जी पत्रकारिता करीत आहोत हे सार श्रेय त्यांचंच आहे या क्षेत्रात काम करत असताना कोणत्याही अडचणीच्या वेळी ते ढाल बनून आमच्या पाठीशी खंबीर उभे राहतात.आपण इतक्या मोठ्या संपादक पदावर काम करत आहोत या गोष्टीची तर त्यांना अजिबात घमंड किंवा बडेजाव पणा ठेवला नाही.

नेहमी हसतमुख,सर्वांशी प्रेमाने, आपुलकीने आणि सलोख्याचे संबंध जपत ते आपले काम प्रामाणिक व चोख बजावत आहेत.

त्यांचा आणखी एक प्लस पॉईंट म्हणजे चुकीला चूक अन् सत्य ते सत्यया अधिक गुणांमुळे ते कायम चर्चेत आहेत.

अशा या कर्तृत्ववान व्यक्तिमत्वास आगामी काळातील कार्यास मनःपूर्वक शुभेच्छा...!!!

**लेखक– जय गायकवाड**
**(पत्रकार), अचलेर**
**मो–८४५९२५०१३८**

## कळंब शहरात निर्भया पथकाची नेमणूक करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



कळंब प्रतिनिधी/ सुधाकर रणदिवे : कळंब शहरात वाढत्या गुन्हेगारी घटनांमुळे नागरिकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली असून, विशेषतः शाळा व महाविद्यालय परिसरात रोडरोमियो व असामाजिक तत्वांचा वाढता वावर चिंतेचा विषय ठरत आहे. महिलांची व विद्यार्थिनींची सुरक्षितता धोक्यात येऊ नये यासाठी नगराध्यक्षा सुनंदा शिवाजी आप्पा कापसे या सातत्याने प्रयत्नशील असून त्यांनी या संदर्भात ठोस पाऊल उचलले आहे.

नगराध्यक्षा कापसे यांनी जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक रितू खोकर यांची भेट घेऊन कळंब शहरात तातडीने निर्भया पथक स्थापन करण्याची मागणी केली. शाळा, महाविद्यालये, बसस्थानके व गर्दीच्या ठिकाणी नियमित गस्त वाढवून रोडरोमियोवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली.

यावेळी नगराध्यक्षा कापसे यांनी शहरातील आणखी काही गंभीर बाबींकडे ही लक्ष वेधले. अल्पवयीन मुलांच्या हातात दुचाकी वाहने मोठ्या प्रमाणात दिसत असून वाहतूक नियमांचे सर्रास उल्लंघन होत आहे. तसेच सिगारेट, सुलोचन व विविध प्रकारच्या अमली पदार्थांच्या सेवनाचे प्रमाण वाढत असल्याची बाबही त्यांनी निदर्शनास आणून दिली. या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाने विशेष मोहीम राबवून कडक कारवाई करावी, शहरात कायद्याचा धाक निर्माण व्हावा आणि पालकां मध्ये ही जनजागृती व्हावी, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली.कळंब शहरातील प्रत्येक मुलगी, महिला आणि नागरिक सुरक्षित असणे हीच आमची प्राथमिकता आहे.

### नगराध्यक्षा सुनंदा कापसे यांची पोलीस अधीक्षकांकडे ठाम मागणी

गुन्हेगारीला कोणतीही तडजोड नाही, असे स्पष्ट मत नगराध्यक्षा कापसे यांनी व्यक्त केले.

या भेटीप्रसंगी धाराशिव शहराच्या नगराध्यक्षा नेहा काकडे, कळंब उपनगराध्यक्ष लखन गायकवाड, नगरसेवक अतुल कवडे, हर्षद अंबुरे, भूषण करंजकर, सौ पुजा धोकटे आदी उपस्थित होते. शहराच्या सुरक्षितते साठी प्रशासन व लोकप्रतिनिधी यांचे संयुक्त प्रयत्न अधिक प्रभावी ठरतील, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.

कळंब शहरात निर्भया पथकाच्या स्थापनेमुळे महिलांमध्ये आत्मविश्वास वाढेल आणि असामाजिक तत्वांना आळा बसेल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## सलग सोळा वर्षापासून दप्तरासह शैक्षणिक साहित्याचे वाटप : शिक्षिका रिंकू जाधवर (धस) यांचा उपक्रम




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : दिनांक २८ फेब्रुवारी वार शनिवार अक्कलकोट तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा उमरगे येथील नवोपक्रमशील प्रयोगशील आदर्श शिक्षिका रिंकू अनंतराव जाधव (धस) या गेल्या सोळा वर्षापासून सलग त्यांच्या शाळेतील विद्यार्थ्यांना दप्तरासह शैक्षणिक साहित्य वाटप करत आहेत .याही वर्षी त्यांनी हा उपक्रम त्यांच्या शाळेत राबवला असून उत्तम दर्जाचे दप्तर वह्या पेन इत्यादी अशा प्रकारच्या साहित्याचे वाटप करत त्यांची

**दप्तर लाखमोलाचे जीवन घडवी विद्यार्थ्यांचे**

या उपक्रमाची परंपरा जपली आहे . तसेच विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारच्या खाऊचे वाटप केले आहे .त्यांच्या शैक्षणिक नवसंकल्पना नवोपक्रम हे नेहमी विद्यार्थी उपयोगी समाज उपयोगी असतात.

हीच दप्तर वाटपाची संकल्पना त्यांनी (SCERT ) राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे राज्यस्तरीय स्पर्धेसाठी सादर केली होती. त्यात त्यांना जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांक प्राप्त झाला होता. याच संकल्पनेचा भाग म्हणून शासनाने सुद्धा दप्तर वाटप हा उपक्रम राबवण्याचे हाती घेतलेले आहे. तसेच परीक्षा पद्धतीवर देखील जाधवर मॅडम यांनी विश्लेषणात्मक लिखाण केलेले आहे त्यानंतर काही वर्गासाठी पास-नापास परीक्षा पद्धतीत बदल केले गेले .अशा अनेक विविधांगी विषयानुसार त्यांचे कार्य अनुकरणीय व कौतुकास्पद आहे. त्यांचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे .भविष्यात असेच नवनवीन विद्यार्थी उपयोगी व समाज उपयोगी उपक्रम संकल्पना राबवावेत याच त्यांना शुभेच्छा ! याप्रसंगी शाळेतील विद्यार्थी माता पालक उपस्थित होत्या.

## प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेंतर्गत ठाण्यात ६ ते ८ मार्चदरम्यान विभागस्तरीय भव्य प्रदर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : केंद्र शासन सहाय्यित प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना अंतर्गत कोकण विभागात ६ ते ८ मार्च २०२६ दरम्यान ठाण्यात विभागस्तरीय अन्न प्रक्रिया उत्पादनांचे प्रदर्शन, विक्री व खरेदीदार-विक्रेते परिषद आयोजित करण्यात आली आहे. ही योजना असंघटित क्षेत्रातील सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांना चालना देण्यासाठी राबविण्यात येत असून, कोकण विभागात आतापर्यंत २०८२ लाभार्थ्यांनी योजनेचा लाभ घेतला आहे. विभागीय कृषि सहसंचालक, कोकण विभाग यांच्या वतीने हे प्रदर्शन दि. ६ मार्च ते ८ मार्च २०२६ या कालावधीत सकाळी १० ते रात्री ८ वाजेपर्यंत बाळासाहेब ठाकरे स्मारक, तीन हात नाका उड्डाणपूल सेवा रस्ता, धर्मवीर नगर, ठाणे (पश्चिम) येथे आयोजित करण्यात आले आहे. २५० हून अधिक उद्योजकांचा सहभाग . या प्रदर्शनात योजनेअंतर्गत लाभ घेतलेल्या किमान २५० अन्न प्रक्रिया उद्योजकांचा सहभाग अपेक्षित आहे. तसेच अन्न प्रक्रिया उद्योगाशी संबंधित उद्योजक व जिल्ह्यातील खरेदीदार यांना एकत्र आणून प्रत्यक्ष भेटी घडवून आणण्यात येणार आहेत. या माध्यमातून विक्रेते-खरेदीदार यांच्यात थेट संवाद होऊन विपणनाच्या नवीन संधी निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. यंत्रसामुग्री, नवीन तंत्रज्ञान आणि वित्तीय मार्गदर्शन मिळणार आहे. प्रदर्शनात अन्न प्रक्रिया उद्योगाशी निगडित आधुनिक यंत्रसामुग्री व साहित्याची दालने उपलब्ध असतील. सहभागी उद्योजकांना नवीन तंत्रज्ञान, संशोधन व प्रक्रिया पद्धतींची माहिती मिळणार आहे. याशिवाय वित्तीय पुरवठा करणाऱ्या बँका आणि विविध संस्थांचा सहभाग राहणार आहे. महिला स्वयंसहाय्यता गटांना प्रोत्साहन देण्यासाठी चरहरीरीहींीर डींरींश ठीरश्र ङर्ळींशश्रळहेवी चळीीळेप (महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान) व डींरींश णीलरप ङर्ळींशश्रळहेवी चळीीळेप (राज्य नागरी जीवनोन्नती अभियान) अंतर्गत बीज भांडवल व गट लाभार्थी महिलांसाठी विशेष दालने उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. भौगोलिक मानांकन व सेंद्रिय उत्पादनांना प्राधान्य या प्रदर्शनात अन्न प्रक्रियेशी संबंधित यंत्रसामुग्री, प्रक्रियायुक्त पदार्थ, भौगोलिक मानांकन प्राप्त पदार्थ तसेच सेंद्रिय उत्पादने यांना विशेष प्राधान्य देण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे स्थानिक सूक्ष्म उद्योजकांना व्यापक बाजारपेठ उपलब्ध होऊन ग्राहकांना उत्कृष्ट दर्जाची अन्न उत्पादने मिळणार असल्याने कोकण विभागातील अन्न प्रक्रिया उद्योगाला मोठी चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## सहा वर्षीय बुशरा व नऊ वर्षीय आमीना या दोन्ही सख्या बहिणीने पूर्ण केला आपल्या आयुष्यातील पहिला रोज़ा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : पवित्र रमजान महिन्यात उपवास, संयम आणि इबादतीला विशेष महत्त्व आहे.

या पवित्र महिन्यात अक्कलकोट शहरातील मौलाली गल्ली येथील अवघ्या ६ वर्षीय बुशरा महिबुब अन्सारी व ९ वर्षीय आमीना महिबुब अन्सारी दोन्ही सख्या बहिणीने

उन्हाच्या तडाख्यात जिवनात पहिल्यांदाच १३ तासांचा रोजा पूर्ण करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

बुशरा व आमीना दोन्ही सख्या बहिणीने संपूर्ण दिवसभर उपवास पाळत धार्मिक शिस्त आणि श्रद्धेचे सुंदर उदाहरण घालून दिले.

बुशरा आणि आमीना या दोन्ही चिमुकल्यानी आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण केल्यामुळे कुटुंबात संध्याकाळी रोजा सुटेपर्यंत घरामधील प्रत्येक व्यक्तीच्या तोंडावर आनंदाचे वातावरण होते त्यासोबतच गल्लीतील नागरिकांनी दोघा बहिनींना शुभेच्छा व कौतुकाचे वर्षाव केले.

सदरोदिन अन्सारी (आजोबा) यांनी आपल्या दोन्ही नातीने एवढ्या लहान वयात आपल्या जीवनातील पहिला रोजा उपवास ठेवून दाखवलेली संयम श्रद्धा आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे असे सांगितले.



## हुन्नूर येथे अखिल भारतीय मराठा महासंघ शाखेचे उद्घाटन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर प्रतिनिधी : अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचा लाभ मंगळवेढा तालुक्यातील तळागाळातील मराठा बांधवांना मिळवून त्यांना मराठा उद्योजक बनवणे हेच आमचे लक्ष असल्याचे परखड मत अखिल भारतीय मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष - अर्जुनराव चव्हाण यांनी सूर्यवंशी वाडी हुन्नूर तालुका मंगळवेढा येथील उपस्थितांना केले. शुक्रवार दिनांक २७ फेब्रुवारी रोजी मंगळवेढा तालुक्यातील हुन्नूर व सूर्यवंशी वाडी येथे अखिल भारतीय मराठा महासंघ या शाखेचे उद्घाटन समारंभ मोठ्या दिमाखात संपन्न झाले.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य - प्रदीप खांडेकर, पंचायत समिती सदस्य - डॉक्टर आप्पासाहेब निकम, युवक जिल्हाध्यक्ष- शिवाजीराव मोरे, विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष - हनुमंत कदम, जिल्हा सहसचिव- विलास देटे सर, तालुकाध्यक्ष- सचिन डोरले, शहराध्यक्ष- अमोल सातपुते, युवक शहराध्यक्ष- अण्णा ओमने, माजी सरपंच- मच्छिंद्र खताळ, मानेवाडी चे सरपंच- सिद्धेश्वर मेटकरी, दत्तआश्रम मठाचे मठाधिपती- होनमोरे महाराज, रावसाहेब कोरे, आनंद लवटे, विकास पुजारी, राजाराम बुरुंगले, बाळूमामा माने, पुजारी नितीन गायकवाड, युवक नेते- प्रताप सूर्यवंशी, हुन्नूर शाखाध्यक्ष- दत्ता माने, उपाध्यक्ष -धनाजी माने, सूर्यवंशी वाडी शाखाध्यक्ष- अमोल सूर्यवंशी, उपाध्यक्ष -अनिकेत सूर्यवंशी, तसेच इतर सर्व पदाधिकारी, सदस्य, ग्रामस्थ, मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. पुढे आपले मनोगत व्यक्त करताना, जिल्हाध्यक्ष- अर्जुनराव चव्हाण यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०१८ साली अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या अध्यक्षपदी नरेंद्र पाटील सिहेब यांची निवड केली व त्यांच्या आदेशाने तळागाळातील शेवटच्या मराठा बांधवांपर्यंत महामंडळाच्या योजनेचा लाभ त्यांना मिळवून द्यायचा असून, माननीय राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांनी महामंडळाला मोठ्या प्रमाणात निधी दिला असून मराठा बांधवांना अधिक उद्योजक बनवण्यापासून आता कोणी राखणार नसल्याचे सांगितले.

पुढे महामंडळाबाबत माहिती देताना सांगितले की, महामंडळाकडे मंगळवेढा तालुक्यातील १२७७ इतकी कर्ज मागणी अर्ज प्राप्त झाले असून, आतापर्यंत ८६१ लाभार्थ्यांना बँक प्रकरण मंजूर झाली आहेत. ८७ कोटी ६१ लाख रुपये महामंडळाकडून वाटप करण्यात आलेले आहेत. महामंडळाकडून ९ कोटी ८० लाख रुपये व्याज परतावा लाभार्थ्यांना मिळालेला आहे. येणाऱ्या काळात मराठा बांधवांनी एकत्र येण्याची गरज असून, आता या पुढील ध्येय महाराष्ट्र मध्ये पाच लाख युवक उद्योजक बनवणे हे असून समाज बांधव उद्योजक बनवल्याशिवाय स्वस्त बसणार नसल्याचे जिल्हाध्यक्ष -अर्जुनराव चव्हाण यांनी सांगितले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ड्रीम प्रोजेक्टला विरोध

## कॉरिडोरला विरोध करण्यासाठी तहसील कार्यालयावर भव्य मोर्चा; मोर्चाला आ.अभिजीत पाटील यांचा पाठिंबा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : शासनाने पंढरपुरात येणाऱ्या नागरिकांना सुख सुविधा मिळाव्यात यासाठी. वाराणसीच्या धर्तीवर कॉरिडॉर करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र यात मंदिर परिसरातील नागरिकांनी विरोध दर्शवला असल्याची दिसून येत आहे.

कॉरिडोर आराखडा तयार झाला असून. कॉर्डरला विरोध करण्यासाठी आज सोमवारी नामदेव पायरी पासून ते तह-सील कार्यालयापर्यंत भव्य मोर्चा काढण्यात आला होता. मोर्चामध्ये माधवारा घाट ते चोपळा तीळ व्यापारी व नागरिक महिला सहभागी झाल्या होत्या.

शासनाने पंढरपुरात कॉरिडॉर करण्याचा निर्णय घेतला आहे यामुळे ६३० मालमत्ता बाधित होणार आहेत. त्यामुळे कॉर्डरला विरोध करण्यासाठी तीर्थक्षेत्र बचाव समितीची स्थापना करण्यात आली आहे. या माध्यमातून विविध आंदोलने करण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर आज सोमवारी तहसील कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला होता

पंढरपुरात कोरेगाव करण्यासाठी शासनाने प्रयत्न सुरू केले आहे. या पाशिम वर आराखडा तयार करण्यात आला असून. तो शिखर परिषदेकडे मंजुरीसाठी पाठवण्यात आला आहे. पंढरपुरात नागरिकांनी बॉर्डरला विरोध करण्यास सुरुवात केली आहे. वेळ निघून गेले हे आता त्याची चर्चा करण्यात काय उपयोग आहे अशी नागरिकांतून चर्चा होत आहे.

अर्थसंकल्पामध्ये कॉरिडरला तरतूद होणार असल्याचे अर्थसंकल्प ६ मार्च रोजी मांडला जाणार आहे या अर्थसंकल्पांमध्ये तीर्थक्षेत्र पंढरपूर येथे कॉरिडोर करण्यासाठी सुमारे ५००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार असल्याची समजते.





त्यामुळे अर्थसंकल्पाकडे लक्ष केंद्रित झाल्याचे दिसून येत आहे.

मंदिर परिसरातील काही व्यापाऱ्यांनी मोर्चा पुढे जाताच आपली दुकाने उघडून आपले व्यवहार चालू ठेवण्याची दिसून आले आहे.



# स्वेरीत 'मराठी भाषा गौरव दिन' कार्यक्रम उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर मधील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मध्ये 'मराठी भाषा गौरव दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मराठी साहित्यातील ज्येष्ठ कवी तथा ज्ञानपीठ पुरस्कार विजेते साहित्यिक कुसुमाग्रज तथा विष्णू वामन शिरवाडकर यांच्या ११४ व्या जयंतीनिमित्त या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक व मान्यवरांची उपस्थिती लाभली.

स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार यांच्या सहकार्याने व उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली आयोजिलेल्या या कार्यक्रमात दीपप्रज्वलन करून, कुसुमाग्रजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविकात सेजल पारगे यांनी 'मराठी भाषा गौरव दिना'चे महत्त्व स्पष्ट करताना 'मराठी ही महाराष्ट्राच्या संस्कृतीची, परंपरेची आणि अस्मितेची भाषा असून तिचा गौरव करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.' असा विचार यावेळी व्यक्त केला. या निमित्ताने लोकगीते, भाषणे, वक्तृत्व स्पर्धा आणि लोककला सादरीकरण यांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवत कला, कौशल्ये आणि वक्तृत्वगुणांचे प्रभावी प्रदर्शन केले. मराठी भाषेचे वैभव, अभिजात दर्जा तसेच आधुनिक युगातील मराठीचे स्थान यावर विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्ण मांडणी केली होती. प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना मानवतावादी बहुउद्देशीय मंडळाच्या अध्यक्षा प्रा. सुरेखा भालेराव- नागटीळक म्हणाल्या की, 'मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त झाला असून मराठी भाषा जोपासणे व त्यात वाढ करणे ही महाराष्ट्रातील प्रत्येक युवकाची नैतिक जबाबदारी आहे. मराठी भाषेचा विसर पडू नये व भाषा कायमस्वरूपी अमर राहावी यासाठी नागरिकांनी आणि विद्यार्थ्यांनी सातत्याने प्रयत्नशील राहावे.' असे सांगितले. डॉ. यशपाल खेडकर म्हणाले की, 'मराठी ही संस्कृती आणि परंपरेची भाषा आहे. यामध्ये संतपरंपरा, हुतात्मे आणि छत्रपती शिवाजी महाराज यांची ही मातृभाषा असून तिला मोठा व गौरवशाली इतिहास लाभला आहे. मराठी भाषेची अस्मिता टिकविण्यासाठी, मराठी भाषेचा सन्मान व संवर्धन करण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत.' असे आवाहन त्यांनी केले. या निमित्ताने घेतलेल्या विविध स्पर्धेतील विजेत्यांना पाहुण्यांच्या हस्ते पुरस्कार देवून गौरविण्यात आले. यामध्ये वक्तृत्व स्पर्धेत अनुक्रमे एलएलबी प्रथम वर्षात शिक्षण घेणाऱ्या तेजश्री चंद्रकांत डांगे, प्रसाद शंकर नागटिळक व इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागात दुसऱ्या वर्षातील ओम अमोल जगताप यांनी बक्षिसे मिळविली. लोककला सादरीकरण स्पर्धेत इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगच्या दुसऱ्या वर्षातील आदित्य भालचंद्र बनसोडे, एलएलबी प्रथम वर्षाच्या नगमा सिकंदर पटेल व प्राची नामदेव कोळी तर शिक्षक विभागात आयोजिलेल्या लोककला सादरीकरण मध्ये पॉलिटेक्निक कॉलेजच्या प्रा. पद्मजा सुनील भिंगारे यांनी बक्षीस मिळविले. याचबरोबर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा व प्राध्यापकांचा यावेळी सत्कार करण्यात आला. यावेळी ॲड. अर्चना कुलकर्णी, प्रा. पी.एस मरे, इतर प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन ऋतुजा कोरके यांनी केले तर आभार विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. एम.एस. मठपती यांनी मानले.

# महसूल विभागाशी संबंधित कामे जलदगीने सोडविण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीराचे आयोजन : तहसिलदार सचिन लंगुटे

**तालुक्यातील १२ मंडळामध्ये ७ मार्च ते १५ मे कालावधीत होणार अभियान'**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : तालुक्यातील सर्वसामान्य जनता, शेतकरी, महिला आणि विद्यार्थ्यांचे महसूल विभागाशी संबंधित कामे जलदगतीने सोडविण्यासाठी पंढरपूर तालुक्यातील १२ मंडळामध्ये दि. ७ मार्च ते १५ मे या कालावधीत 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान' राबविण्यात येणार असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला व विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचण्यासाठी हे महाराजस्व समाधान शिबीर अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियान मोहिमेत विविध विभागाचे अधिकारी गावपातळीवर उपस्थित राहून नागरिकांच्या प्रलंबित कामांचा तात्काळ निपटारा करण्यात येणार आहे. शनिवार दि. ०७ मार्चला कासेगांव, करकंब, १४ मार्चला भाळवणी, पुळुज शुक्रवार दि. १० एप्रिल रोजी खर्डी, पटवर्धन कुरोली, शुक्रवार दि. १७ एप्रिल रोजी भंडीशेगाव, रोपळे शुक्रवार दि. ८ मे रोजी पंढरपूर तर शुक्रवार दि. १५ मे रोजी तुंगत चळे या मंडळात शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे या शिबिरा अंतर्गत प्रलंबित अस-लेले फेरफार निकाली काढणे, अभिलेख दुरुस्ती, लोकसेवा हक्क कायदा, अकृषिक तरतुदी संदर्भातील सुधारणाबाबत मार्गदर्शन, भूसंपादन केलेल्या व अकृषीक परवानगी दिलेल्या प्रकरणी कमी जास्त पत्रके तयार करून गाव दप्तर अद्यावत करणे, सुधारणा व नागरिकायदा त्याचबरोबर उत्पन्न, रहिवासी, अधिवास, जात व नॉन क्रिमीलेअर दाखले यांच्याबाबत तात्काळ सेवा दिली जाणार आहे. तरी पंढरपूर तालुक्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी या महाराजस्व समाधान शिबिर मोहिमेचा लाभ घ्यावा असे आवाहन तहसीलदार श्री. लंगुटे यांनी केले आहे.

# श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील गृहविज्ञान महिला महाविद्यालय येथे मराठी भाषा गौरव दिन उत्साहात



पंढरपूर प्रतिनिधी : मराठी गौरव भाषेचा, जागर आपल्या मातृभाषेचा श्रीमती रत्न बाबा देवी मोहिते पाटील गृह विज्ञान महिला महाविद्यालय अकलूज येथे 'मराठी भाषा गौरव दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. पूजा कार्यक्रमाची सुरुवात ज्ञानपीठ पुरस्कार विजेते साहित्य विवा शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या स्मृतीने आणि लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी या तीन गायनाने करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या प्रास्ताविक मध्ये महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉक्टर छाया भिसे यांनी मराठी भाषेची महत्त्व. सिद्धी समृद्ध परंपरा व अच्छा काळातील उपयुक्तता यावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे व व्याख्याते पंचवटी अकलूज येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक सुहास पुरवणी व राजाराम गुजर उपस्थित होते. यावेळी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात गुजर यांनी महाविद्यालयीन विद्यार्थिनीवर सुंदर कविता सादर करून कार्यक्रमाची रंगत वाढवली. माझा मराठीचा बोलू कौतुके या विषयावर मार्गदर्शन करताना तर सुहास पुरवणे यांनी मराठी भाषेचा अभिमान बाळगणे आणि डीजे पण व्यवहारात तिचा वापर वाढवणे आवश्यक असल्याचे सांगितले. त्यांनी एवं मार्गदर्शन केले. कुमारी ऐवन तांबोळी आणि कुमारी श्रावणी दोरकर, विद्यार्थ्यांनी मराठी भाषा गौरव दिनानिमित्ताने अत्यंत प्रेरणादायी मनोगते व्यक्त केली.

कार्यक्रमाचे संचलन महाविद्यालय विकास समिती अध्यक्ष सुपर आणि विजयसिंह मोहिते पाटील यांनी मार्गदर्शन केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा काळाराम मंदिर सत्याग्रह: एक ऐतिहासिक लढा- सतपाल बनसोडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



कळंब/प्रतिनिधी : कळंब येथील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहासाठी ची आठवण म्हणून दि.२ मार्च २०२६ रोजी पुष्प-हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी सतपाल बनसोडे यांनी असे म्हटले कि,२ मार्च १९२७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनुसूचित जातीच्या लोकांना नाशिकच्या काळाराम मंदिरात प्रवेशासाठी पुकारलेला लढा हा केवळ मंदिर प्रवेशासाठी नव्हता, तर तो मानवी हक्कांच्या सन्मानासाठी होता. हा लढा तब्बल पाच वर्षे चालू राहिला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी असे म्हटले होते, की , आम्ही मंदिरात जा-तो म्हणून आम्ही देव होऊ असे नाही, तर आम्हाला इतर माणसांप्रमाणेच हक्क आहेत हे सिद्ध करण्यासाठी आमचा हा लढा आहे. असे मत व्यक्त केले. या दिवसाच्या आठवणीला उजाळात देत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास विनम्र अभिवादन करण्यात आले.

या वेळी सामाजिक कार्यकर्ते सतपाल बनसोडे, ह. भ. प. महादेव महाराज अडसूळ, माजी नगरसेवक सुनील गायकवाड, रिपाई तालुकाध्यक्ष शिवाजी शिरसाठ, राजाभाऊ गायकवाड, बाळासाहेब हौसलमल, आकाश बनसोडे, सुमित रणदिवे, सुदीप देवकर, सूर्यकांत डावरे, दीपक गायकवाड, नितीन आंगरखे, धनंजय चिलवंत उपस्थित होते.

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनची १५९ वी शतकोत्तर मोफत वैचारिक प्रबोधनात्मक कार्यशाळा

## बी. बी. मेश्राम यांचे प्रतिपादन

# जीवनाच्या सर्व क्षेत्रातील गुन्हेगारीच्या निर्मूलनासाठी कृती कार्यक्रम राबविले पाहिजेत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन, साकेत बुद्ध विहार समिती व दि ऑल इंडिया नाग संघाच्या संयुक्त विद्यमाने गुन्हेगार आरोपीला दिलेली शिक्षा तहकूब करणे म्हणजे कायद्याचे उच्छेदनच होय. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाच्या ८८ व्या वर्धापन दिनानिमित्त सद-रील ऐतिहासिक, प्रासंगिक विषयावर १५९ वी शतकोत्तर मोफत वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा साकेत बुद्ध विहार, साकेत नगर, छत्रपती संभाजीनगर येथे १ मार्च २०२६ ला संपन्न झाली.

फुले, शाहू, आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, जाधव गांधी व धीरजलाल या सटोडियन जुगारांना मुंबई हायकोर्टाने दिलेली शिक्षा गृहमंत्री मुंशी यांनी तहकूब केली होती ज्याला बॅरिस्टर जमनादास मेहता यांनी आव्हान दिले होते, त्याला बाबासाहेबांनी समर्थन दिले होते. त्याप्रसंगी बाबासाहेब आंबेडकरांनी गुन्हेगार आरोपीला दिलेली शिक्षा तहकूब करणे म्हणजे कायद्याचे उच्छेदनच होय असा संदेश दिला होता.

तसेच महाड सत्याग्रहात त्यांनी छोटा उद्देश ठेवणे हा सुद्धा गुन्हाच आहे, असे म्हटले होते. त्याप्रमाणे वर्तमान परिस्थितीचा विचार करता सामाजिक, धार्मिक व राजकीय क्षेत्रातील गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर विचार केला पाहिजे. करिता शिक्षित व्यक्ती शील व सौजन्याअभावी क्रूर ठरू नये. म्हणून कार्यशाळेची प्रक्रिया आणि संदेश समजून घेण्यासाठी दर रविवारी विहारात पोहोचलेच पाहिजे. जेणेकरून समजून घेण्याची व समजा-वून सांगण्याची प्रक्रिया वेगाने गतिमान केली जाईल. करिता चळवळीतील महिलांचे नगण्य प्रमाण वाढवावे लागेल कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २० जुलै १९४२ ला समाजात महिलांनी किती प्रमाणात प्रगती केलेली आहे? यावरूनच त्या समाजातील प्रगती मोजता येईल, असे स्पष्ट केले होते. करिता महिलांनी पुढाकार घेऊन येणाऱ्या जागतिक महिला दिनापासून विचारमंथनाणे कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी करावी. परिणामी जीवनाच्या सर्व क्षेत्रातून गुन्हेगारीचे निर्मूलन करण्यासाठी कृती कार्यक्रम राबविले पाहिजेत.



उद्घाटनपर मार्गदर्शन करताना जिल्हा व सत्र न्यायालयाचे वकील सामाजिक कार्यकर्ते ॲड. जी. एन. खंडागळे म्हणाले की, शिक्षा झाल्यावर आरोपी लगेच तुरुंगात जा-तो असे मुळीच नाही, तर त्याला सुद्धा एक प्रक्रिया असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ऐतिहासिक काळात तत्कालीन परिस्थितीत केलेले विधान आजही तंतोतंत लागू पडते.

प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाचे प्रा. शिवम गायकवाड म्हणाले की, सर्व क्षेत्रातील कायद्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अस्तित्व पाहायला मिळते. त्यांचे बहुतांश विधान हे त्रिकाल बाधित सत्य आ-हेत. समान गुन्ह्याला समान शिक्षा व्हायला हवी. कुठल्याही न्यायालयीन आदेशाला स्थगिती कशासाठी दिली जाते? हे आपण नीट समजून घेतले पाहिजे. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट केल्याप्रमाणे फाशीची शिक्षा व मृत्युदंड यातील फरक समजून घेतला पाहिजे. आईने आपल्या मुलांना आठच्या आत घरात यायच्या नियमाची अंमलबजावणी केली पाहिजे. ज्यामुळे गुन्हेगारीचे प्रमाण कमी होऊ शकते.

याप्रसंगी उद्योजक शशिकांत काळे म्हणाले की, आपली माणसे हजार पाचशे रुपयात विकली जात असतील तर त्यांना बाबासाहेबाचे नाव घेण्याचा काय अधिकार आहे? करिता आदर्श महापुरुषांच्या संदेशाचे तंतोतंत पालन करावे लागेल. डॉ. कल्पना गंगावणे म्हणाल्या की, आपण अभ्यासू प्रवृत्ती जोपासून आंबेडकरी विचार जनतेपर्यंत प्रचारित आणि प्रसारित केले पाहिजेत. प्रिया खंडागळे मॅडम म्हणाल्या की, समाजप्रबोधनासाठी अशा प्रकारच्या कार्यशाळांची नितांत आवश्यकता आहे. संघराज धम्मकीर्ती म्हणाले की, अनेक विहारात विशिष्ट लोकांचे प्राबल्य पाहायला मिळते, तर मग सामान्य जनतेचे काय? अन्याय अत्याचार होऊ नयेत यासाठी धम्माचरण केले पाहिजे. उद्योजक मिलिंद बागुल म्हणाले की, कार्यशाळेचे हे जगातील पहिले मॉडेल असेल की, ज्यात मागील तीन वर्षापासून प्रबोधनासाठी १५९ कार्यशाळांचे आयोजन केलेले आहे.

सुरुवातीला आदर्शांना पुष्प व पुष्पमाला अर्पण करून स्टडी फाउंडेशनच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी विहार समितीचे कार्याध्यक्ष सुभाष साबळे यांची विशेष उपस्थिती होती. सूत्रसंचालन ॲड. विलास रामटेके तर प्रास्ताविक प्रा. विलास कटारे यांनी तर शशिकांत काळे यांनी आभार व्यक्त केले. अशाप्रकारे हर्षोल्हासात मोफत साप्ताहिक कार्यशाळा संपन्न झाली.

# नियमबाह्य सायलेन्सर मोडिफाय करून बसवू नयेत

## बुलेट सायलेन्सरच्या आवाजात बदल करणाऱ्यांवर होणार कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपुरात बुलेट दुचाकीधारकांकडून कंपनीने नियमानुसार दिलेले सायलेन्सर काढून त्याऐवजी मोठ्या कर्कश आवाजाचे नियमबाह्य सायलेन्सर बसविण्याचे प्रकार वाढले असून, त्यामुळे ध्वनी प्रदूषणात मोठी वाढ होत असल्याचे निदर्शनास आले आहे. शहर व परिसरातील नागरिकांनी आपल्या दुचाकी, विशेषतः बुलेट वाहनांवर कंपनीने नियमाप्रमाणे दिलेले सायलेन्सरच वापरावेत. मोठ्या कर्कश आवाजाचे, नियमबाह्य सायलेन्सर मोडिफाय करून बसवू नयेत, असे आवाहन सहा. पोलिस अधिक्षक प्रशांत डगळे यांनी केले आहे.

### सहा.पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे यांचे आवाहन

बुलेट सायलन्सरमधील फेरफारामुळे ध्वनीप्रदूषणात वाढ होत असून नागरिकांना विशेषतः रात्रीच्या वेळी त्रास सहन करावा लागतो. या कर्कश आवाजामुळे ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, रुग्ण, महिला तसेच सर्वसामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आ-हेत.नागरिकांनी वाहनांमध्ये अनधिकृत बदल न करता वाहतूक नियमांचे पालन करावे. शहरात बुलेट दुचाकीच्या सायलन्सर मध्ये बदल करुन मोठा आवाज करणाऱ्यांवर वाहतूक शाखेकडून विशेष मोहिम राबविण्यात येत असून. नागरिकांनी दुचाकी वाहनांवर कंपनीने नियमाप्रमाणे दिलेले सायलेन्सरच वापरावेत. नियमांचे



उल्लंघन करणाऱ्यांविरोधात ध्वनी प्रदुषण नियम व पर्यावरण संरक्षण अधिनियम या अतंर्गत संबधितावर कारवाई करण्यात येईल असे आवाहनही आवाहन सहा. पोलिस अधिक्षक प्रशांत डगळे यांनी केले आहे.

# कळंब शेकडो घरांची वीज बंद केल्याच्या निषेधार्थ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : दहावी बोर्ड परिक्षा सुरू असताना तसेच उन्हाळ्यात वीजेची मागणी जास्त असताना कळंब शहरात महावितरण कंपनीच्या स्मार्ट मीटर प्रणा-लीमुळे शेकडो ग्राहकांचा वीज पुरवठा बंद केला. थकीत बिलांमुळे वीज पुरवठा बंद केला असल्याचे कारण महावितरण कंपनीने पुढे केले. महावितरणचा निषेध म्हणून कळंब येथील सामाजिक कार्यकर्ते राहुल मुळे यांनी महावितरण कंपनीच्या कळंब कार्यालयाच्या दारात होळी दिवशीच वीज बिलांची होळी करून महावितरण कंपनीच्या कार्यपद्धतीचा निषेध नोंदवला.

कळंब महावितरण कडे दाखल केलेल्या तक्रार अर्जात तीन प्रश्न विचारले गेले १.कळंब शहरात घरगुती वीज वापर करणाऱ्या ग्राहकांची एकुण संख्या किती आहे,



त्यापैकी किती ग्राहकांच्या घरी स्मार्ट मीटर बसवले गेले

### महावितरणच्या दारात वीज बिलांची केली होळी

? २.ज्या ग्राहकांच्या घरी स्मार्ट मीटर बसवले गेले त्यांची स्मार्ट मीटर बसवण्यासाठी पुर्वपरवानगी घेतली होती का ? ३.कळंब शहरातील स्मार्ट मीटर ग्राहकांचा वीज पुरवठा बंद करण्यापुर्वी महावितरण कंपनीच्या कळंब कार्यालयाने कळंब शहरातील घरगुती वीज वापर करणाऱ्या सर्व स्मार्ट मीटर ग्राहकांना थकबाकी न भरल्यास वीज पुरवठा वरिष्ठ पातळीवरून आ-पोआप बंद होणार आहे याबाबत कळंब शहरात जनजागृती करुण माहिती दिली होती का ? याचा लेखी खुल-ासा महावितरण कंपनीने करावा अशी मागणी कळंब येथील सामाजिक कार्यकर्ते राहुल मुळे यांनी महावितरण कंपनीच्या कळंब कार्यालयाकडे केली आहे.

# खामसवाडी येथील जगदंबा माध्यमिक विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

खामसवाडी: प्रतिनिधी, हनुमंत पाटुळे दि.१ कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील जगदंबा माध्यमिक विद्यालयात दि.२८ फेब्रुवारी २०२६ रोजी इयत्ता आठवीतील एन. एम.एम. एस. शिष्यवृत्ती परीक्षा (२०२५-२६) या शैक्षणिक वर्षात शाळेतील एकुण ९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार शिक्षक आमदार मा.श्री.विक्रम (बप्पा) वसंतराव काळे, संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.अशोक (बापू) त्रिंबकराव शेळके, तेरणा सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन मा. श्री. बाळासाहेब (भाऊ) घाडगे-पाटील, संस्थेचे सर्व



संचालक तसेच इतर मान्यवर यांच्या हस्ते पालक, शिक्षक व ग्रामस्थ यांच्या समवेत करण्यात आला. या सत्कार मुर्ती मध्ये राजनंदनी राम चव्हाण, प्रणाली राम महाजन, अशा अरविंद शेळके, मयुरी दिनेश माने, प्रणिता हरिदास कुंभार, वर्षा शिवाजी शिंदे, अंजली आबाराव पाटोळे, ऋतुजा व्यंकट महाजन, वैभव व्यंकट गव्हाणे या विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात आला. या परीक्षेसाठी शाळेच्या मुख्याध्यापिका मंदाकिनी सावंत, आशाबाई पाटूळे, बिभिषण शिंदे, अनंत गर्जे, मेटे, यांनी परिश्रम घेतले. यावेळी विद्यार्थ्यां बरोबर शिक्षकांचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी प्रशालेचे संस्थापक अध्यक्ष अशोक त्रिंबकराव शेळके यांनी असे म्हटले की, जगदंबा माध्यमिक विद्यालयात शाळेची शैक्षणिक गुणवत्ते बरोबरच शिस्त-संस्कार ही संकल्पना वृंधिगत होत राहणार असून आम्ही या विद्यालयाकडे स्वतः कटाक्षाने लक्ष देऊन आ-होत त्यामुळे विद्यार्थ्यांनीही अशा परीक्षेमध्ये जास्तीत जास्त संख्येने सहभाग घेऊन स्वतःचे व प्रशालेचे नाव करावे असे मत व्यक्त करून गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या कार्यक्रमासाठी पालक, ग्रामस्थ, पत्रकार, विद्यार्थी, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तडवळ ओंकार पॉवर कॉर्पोरेशन प्रा. लि. युनिट नंबर ५ कारखान्याचा ६.८१ लाख मेट्रिक टन ऊस गाळप करून सांगता समारंभ संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : गाळप हंगाम २०२५/ २६ च्या सांगता समारंभाचा कार्यक्रम दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ रोजी संपन्न झाला. मा .संचालक श्री ओमराजे बाबुराव बोत्रे पाटील यांच्या प्रमुख उप-

पार पडला. मा.

६:५० ाि, १/३/२०२६ ठर-क्षशपवीर घेीज्ञश झरींळश्र: मा. चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली हंगामात कारखान्याची उल्लेखनीय कामगिरी करत ६.८१ लाख मॅट्रिक टन ऊस

४.४२ कोटी युनिट वीज निर्मिती व २.८० कोटी युनिट वीज निर्मिती केली आहे यावेळी ऊस उत्पादक शेतकरी तोडणे वाहतूक ठेकेदार कारखान्याची जनरल मॅनेजर गायकवाड व सर्व खाते प्रमुख अधिकारी कर्मचारी उप-स्थित होते.




# महिला सक्षमीकरण सप्ताहाचे नागणसूर येथे उत्साहात उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : नागण-सूर (ता. अक्कलकोट) येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड मुली व मुले शाळेत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत महिला सक्षमीकरण सप्ताहाचे उद्घाटन उत्स-ाहात पार पडले. शासनाच्या परिपत्रकानुसार २ ते ८ मार्च दरम्यान विविध विभागांच्या समन्वयातून महिला सक्षमीकरणासाठी उपक्रम राबविण्यात येत असून त्याच अनुषंगाने शाळेत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मा.गटविकास अधिकारी शंकर कवितके यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडले.

यावेळी गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे, केंद्रप्रमुख श्रीमंत पुजारी, वीरेंद्र गजा व संतोष चिंचोळीकर प्रमुख उप-स्थित होते.

> **सोनू सूद फाऊंडेशन सोलापूर जिल्हा प्रमुख विपुल मिरजकर यांच्या नेतृत्वात अक्कलकोट तालुका प्रमुख शरणप्पा फुलारी यांच्या सहकार्यातून डाबर कंपनीच्या सहयोगातून या प्रसंगी उपस्थित महिला व शाळेतील १६० मुलींना सोनू सूद फाऊंडेशनकडून डाळिंब रिअल ज्यूस व ग्लुकोजचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाचे उपस्थितांनी स्वागत केले.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा गुरुबाई प्रचंडे तर उपाध्यक्षा नागम्मा मठपती होत्या. व्यासपीठावर प्रेमा बनसोडे अंगणवाडी सेविका भौरम्मा सक्करगी, सविता थंब, राजश्री मोगली, श्रीदेवी विभुते व त्रिवेणी कळसगोंडा उपस्थित होत्या. बहुसंख्येने महिला व शाळेतील किशोरवयीन मुलींची उपस्थिती लक्षणीय होती.

लक्ष्मीकांत तळवार यांनी महिला सक्षमीकरण सप्ताहात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. शिक्षण, आरोग्य, पोषण, कायदेविषयक जनजागृती, किशोरवयीन मुलींसाठी मार्गदर्शन आदी उपक्रमांद्वारे महिलांना सबलीकरणाचा संदेश देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजकुमार नरुने यांनी केले, तर आभार प्रदर्शन कल्याणी गंगोंडा यांनी मानले.

महिला सक्षमीकरण सप्ताहाच्या निमित्ताने नागण-सूर येथे महिलांच्या सन्मान व सक्षमीकरणाचा प्रेरणादायी संदेश देणारा कार्यक्रम उत्स-ाहात संपन्न झाला.

कार्यक्रम यशस्वी

### सोनू सूद फाऊंडेशन कडून १६० मुलींना डाळिंब रिअल ज्यूस व ग्लुकोजचे वाटप

करण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका शांता तोळनूरे, विजयश्री एंटमन, राजशेखर कुर्ले, कल्याणी गंगोंडा, राजकुमार खानापुरे, शोभा कलशेट्टी, चन्नम्मा बिराजदार, मलकप्पा हिप्परगी, राजकुमार नरुने, लक्ष्मीकांत तळवार आदींनी परिश्रम घेतले.

## ज्येष्ठ नागरिक, महिला, दिव्यांग प्रवाशांना मोठा दिलासा

# एसटीच्या तिकिटाबाबत शासनाचा यु टर्न!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

एसटी बस ने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना विविध प्रकारच्या तिकिटांमध्ये सवलती राज्य परिवहन महामंडळाकडून दिल्या जातात. यामध्ये ज्येष्ठ नागरिकांना

### एनसीएमसी कार्डाबाबत दिले स्पष्टीकरण, कार्ड सध्या अनिवार्य नाही

मोफत प्रवास, महिलांना हाफ तिकीट प्रवास तर विद्यार्थ्यांना सवलतीच्या दरात पास अशा योजना आहेत पण या योजनेचा लाभ घेणाऱ्या सर्वांना आता नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (NCMC) बंधनकारक करण्यात आल्याचे राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी नुकतीच जाहीर केले होते. त्यानंतर त्यांच्या बातमी प्रसिद्ध झाल्या होत्या पण आता शास-नाने यावरून यु टर्न घेतला असून मोठा खुलासा केला आहे की राज्य परिवहन महामंडळाने भेट द्वारे माहिती दिली आहे की NCMC स्मार्ट कार्ड बंद करत करण्यात असल्याच्या राज्याचे तरुण मंत्री प्रताप सरनाईक यांनी नुकताच जाहीर केला होता पण त्यानंतर त्यांनी बातम्याही प्रसिद्ध झाल्या पण आता शासनाने न्यूटन घेतला असून मोठा खुल-ासा केला जात आहे राज्य पण मंडळाकडून तिकडे माहिती दिली असते. NCMC स्मारकाची नोंदणी प्रत्येक आगारात सुरू झाले आहे, तथापि, एसटी प्रवासात या स्मारकाडाचे अद्याप शक्ती करण्यात आ-लेली नाही. कृपया सर्व प्रवाशांनी याची नोंद घ्यावी. एसटीचे सहाय्यक जनसंपर्क अधिकारी रोहन देसाई यांनी ही माहिती दिली आहे. दरम्यान राज्याचे प्रसिद्ध विभागातील अर्थात माहिती व जनसंपर्क संचालनायक हीच माहिती शेअर करताना



सवलतीच्या एसटी तिकिटासाठी एनसीएमसी कार्ड सध्या अनिवार्य नाही ती अन्व-ारी असल्याचा सोशल मीडियावर दावा खोटा आणि जनतेची दिशाभूल करणार आहे असे स्पष्ट आहे यावरून एकीकडे राज्याची परिवहन मंत्र्यांनी स्वतःचेही कार्ड अनिवार्य करण्यात आल्याचे पत्रकार परिषदेत सांगितले आणि दुसरीकडे त्यांच्या बातम्या या दिशाभूल करणाऱ्या बातम्या असल्याचे आता राज्याची प्रसिद्ध विभागातील म्हटले आहे यावरून राज्यात शासनाच्या यावरून गोंधळ सुरू असल्याचा स्पष्ट झाला आहे कदाचित NCMC कार्ड अन्वार्य केल्यानंतर सर्वसामान्य नागरिकांच्या अनेक तक्रारी येऊ लागल्या तसेच आधीच आधार कार्ड विविध प्रकारची कार्ड शासनाने नागरिकांसाठी बंद कार्य केलेले असताना यात आणखी एका कार्डाची भर कशासाठी असा थेट सव-ालही नागरिक विचारायला लागले आहेत तसेच हे कार्ड ९९९ विकत घेऊन त्यात कमीत कमी १०० रुपये बॅलन्स आणि ते रिचार्ज ५० रुपयांच्या पटीत होणार असल्याने या गोष्टी देखील सर्वसामान्य खेड्यापाड्यातील प्रवाशांची जाचक असल्याचा त्यांचा म्हणणं आहे त्यामुळे शासनाने आपल्या निर्णयातून न्यूटन घेतल्याची स्पष्टीकरण दिसून येत आहे.

# शासकीय विश्रामगृह छत्रपती संभाजीनगर येथे रिपब्लिकन सेनेची संवाद बैठक उत्साहात संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर/योगेश शिंदे : सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांनी या महत्वपूर्ण संवाद बैठकीला पदाधिकारी कार्यकर्त्यांना संबोधित केले. सरसेनानी आनंदराज आंबेडकर म्हणाले की पदाधिकारी कार्यकर्त्यांनी स्वतः मधला आंबेडकर वाद हा सदैव जागृत ठेवून कार्यरत असलं पाहिजे,न्याय हक्कांसाठी तसेच शोषित वंचित घटकांसाठी रिपब्लिकन सेना सदैव कटिबद्ध असल्याचा ठासून सांगितले. यावेळी कार्यकर्त्यांमध्ये या जोशपूर्ण भाषणाने उप-स्थित यामध्ये उत्साह संचारला. यावेळी व्यासपीठावर प्रमुख उपस्थितीत मा.डॉ.सुशील कुमार सूर्यवंशी, राष्ट्रीय उपाध्यक्ष प्राचार्य सुनील वाकेकर, महाराष्ट्र नेते तथा जिल्हा प्रभारी, विजय शिंदे मराठवाडा उपाध्यक्ष, सचिन निकम रिपब्लिकन विद्यार्थी सेना मराठवाडा अध्यक्ष, विजय मोरे बुलढाणा जिल्हाध्यक्ष, विजय साळवे बीड जिल्हाध्यक्ष हे होते. या महत्वपूर्ण संवाद बैठकीचे आयोजन काकासाहेब गायकवाड जिल्हाध्यक्ष पश्चिम व सुनील पांडे जिल्हा प्रवक्ते यांनी केले होते. सरसेनानी मा.आनंदराज आंबेडकर यांच्या उपस्थितीमध्ये भीमशक्तीचे नेते अनिल मगरे, संजय सातपुते यांनी त्यांच्या समर्थकांसह पक्षप्रवेश घेतला.तसेच यामध्ये पूर्ण संवाद बैठकीसाठी

अजय बनसोडे, मनीषा-ताई साळुंखेजिल्हाध्यक्ष महिला आघाडी, राहुल कानडे युवक जिल्हाध्यक्ष, गुलाब जाधव युवक जिल्हाध्यक्ष पूर्व बबन साठे, अतुल कांबळे, विनोद वाकोडे, राजेश भालेराव,अनिल हिवाळे, अनिल खरात अनिल साळवे, प्रवीण शिंदे, सरिता ताई वाघमारे, राजूभाऊ मगरे, राजा बाबू बनसोडे, बाळा बनसोडे, सुखदान भाऊ,जाधव भाऊ तसेच इतरही प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.